# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## (शिक्षण विभाग)

जा.क्र. ५२०३ /शि.वि./२०१५ दि. २०/०८/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
प्राथ/उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- ऑनलाईन शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याकरीता शाळांकडून विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारण्याबाबत.**

**संदर्भ** - १. मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे दि.०३.०८.२०१५ च्या सुचनेच्या अनुषंगाने.
२. क्र.जिपना/सकवि/ई-स्कॉलरशिप/२०१५-१६/१४३२, दि.०६.०८.२०१५

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय दूरध्वनीव्दारे मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी नागपूर जिल्हयातील काही शाळांकडून विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता विद्यार्थ्यांवर शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे कळविले आहे. माननीय महोदयांच्या मते, सदर बाब अतिशय गंभीर असून अशा प्रकारे विद्यार्थ्यांवर नियमबाहय शुल्क आकारणाऱ्या शाळांबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून अशा शाळांवर प्रशासकीय तसेच फौजदारी स्वरूपाची कार्यवाही का करण्यात येऊ नये, अशी विचारणा केली आहे.

तेव्हा आपण कार्यरत असणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांकडून अशाप्रकारचे नियमबाहय शुल्क आकारणी न करण्याचे स्पष्ट निर्देश आपले स्तरावरून सर्व वर्ग शिक्षकांना देण्यात यावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

प्रतिलिपी,

१. मा. आयुक्त, समाज कल्याण, म.रा. पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. आयुक्त, म.न.पा., नागपूर.
४. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
५. मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर
६. सहा.शिक्षणाधिकारी, म.न.पा., नागपूर
७. सर्व शाळा निरीक्षक, झोन क्र.१ ते १०, म.न.पा., नागपूर

PC:3/C:/SRW/letter.doc